वाचाः-१. महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७,

२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील

अ) शासन परिपत्रक क्र.एमआयएस १०८९/सीआर/२४८/८९/१३.(एक), दि.२१/०७/१९८९

ब) शासन निर्णय क्र.बीसीसी-१०३/प्र.क्र.१६०/९३/१६-ब, दि.२२/११/१९९३

क) शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२०११/३९, दिनांक १९/०३/२००३

ड) शासननिर्णय क्र.प्रानिमं -२००७/प्र.क्र. ४६/०७/११३-अ दि. १९/१०/२००७,

इ) शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ,दि.०४ मे २०२२,

३.महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई -३२ कडील

अ) शासन निर्णय क्र.एसआरव्ही १०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ, दिनांक०२/०५/१९९८

ब) पत्रक्रं.एपीटी-२००७/प्र.क्र.२६/आस्था-८ दि.१४/१२/९८

क) ग्राम विकास व जलसंधारणविभागाकडील शा.नि. क्र.एपीटी-१००१/प्र.क्र.९६०/आस्था-८ दि. २७/६/२००३,

ड) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण १००३/प्र.क्र.९६/२००३/१३-अ, दिनांक १९/११/२००३

इ) शासन निर्णय क्र.एसआरव्ही २००४/प्र.क्र.१२/०४/बारा, दिनांक ०७/०६/२००४

ई) पत्रक्रं.एपीटी-२०११/प्र.क्र.११९/आस्था-८, दि.२९/०९/२०११ व परिपत्रक क्रं.एपीटी-२००९/प्र.क्र.३५२/आस्था-८ दि.१७/१२/०९,

उ)पत्रक्रं एपीटी-२०१२/प्र.क्रं.१४३/आस्था-८ दि. ७ एप्रिल २०१२,

ऊ) शासन निर्णय.क्र.डिएसआर-२०१९/प्रक्र-१६/आस्था-५/दि ०६/०३/२०१९,

फ) शासन निर्णय क्र.एपिटी/1000/प्र.क्र.272/13 दि.06 जुन 2001

४. महाराष्ट्र शासन वित्त विभाग मंत्रालय मुंबई कडील

अ) शासन निर्णय.क्रं.असक-१०१०/प्र.क्रं.१/२०१० वित्तीय सुधारणा-१ दि.५ जुन २०१० व

ब) शासन निर्णय क्र. वेपुर ११२१/प्रक्र.०४/सेवा-९/ दि १३/०२/२०२३

५. मा.सहाय्यक आयुक्त (मावक) नाशिक यांचेकडील बिंदुनोंदवही तपासणी दि.१३/०५/२०२३,

६. महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. जिपजा-२०१६/प्र.क्र.३०१/पापु-२३, दि.२८/१२/२०२२,

७. म.उपसचिव,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.११/आस्था-८,दि.१२ मे २०२३,

८. जिल्हा परिषद जळगांव विविध संवर्गाची पद भरती जाहिरात क्र ०१/२०२३,

९. आय.बी.पी.एस. कडून प्राप्त निकाल त्यानुसार प्रसिध्द व तात्पुरत्या गुणवत्तेनुसार निवड यादी दि.24/09/2024,

१०. जि.प.जळगांव सरळसेवा पदभरती २०२३ कागदपत्र पडताळणी दि २७/०९/२०२४,०३/१०/२०२४,०७/१०/२०२४

११. गुणवत्तेनुसार प्रसिध्द प्रतिक्षा व अंतिम निवड यादी, जिल्हा निवड समिती इतिवृत्त दि.०९/१०/२०२४

---

**नेमणुक आदेश**

जाक्र/ग्राप/आस्था-२/आरआर/५९७७१/२०२५
ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, जळगाव
दिनांक :- २८/३/2025

ज्याअर्थी उपरोक्त वाचा मध्ये नमुद शासन संदर्भ नियम, जिल्हा निवड समिती इतिवृत्त प्रसिध्द जाहिरात त्यातील अटी व शर्ती तसेच त्यात नमुद नियम, आय.बी.पी.एस कडील प्राप्त गुणवत्ता यादी व महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967 नुसार वाचा क्र.११ नुसार प्रसिध्द झालेली **अंतिम निवड यादीतील प्रकल्पग्रस्त,माजी सैनिक, दिव्यांग या समांतर आरक्षणातील निवड झालेले उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी होऊन प्राप्त झालेली असुन ते वैध असल्याचा अहवाल प्राप्त झालेला असल्याने तसेच अंतिम निवड यादीतील नियुक्ती आदेश दिलेले उमेदवारांपैकी अपात्र ठरलेले तसेच विहीत मुदतीत हजर न झालेले उमेदवार यांचे ऐवजी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची निवड करणेकामी** मला असलेल्या अधिकारांचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,जळगांव खालील विवरणपत्रात नमुद ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद,जळगांव अंतर्गत **"कंत्राटी ग्रामसेवक"** या पदावर तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन तत्वावर नेमणूक करण्यात येत आहे. सदर उमेदवारांची निवड खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन करण्यांत येत आहे. त्यांना आदेशातील अटी व शर्ती मान्य असलेबाबत विहित नमुन्यातील हमीपत्र कार्यालय प्रमुखा कडे संबंधित उमेदवारांने लिहुन देणे आवश्यक राहील.

| अ. क्र | गुण वत्ता क्र | निवड झालेले उमेदवार यांचे नांव व पत्ता | मुळ जातीचा प्रवर्ग | निवडी चा प्रवर्ग | समांतर आरक्षण प्रकार | पदस्थापना केलेले ग्रामपंचायतीचे नांव व तालुका पंचायत समिती |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 25 | तुषार प्रकाश चौधरी<br>प्लॉट नं १८ रेणुका नगर, वरणगांव ता.भुसावळ जि.जळगांव 425305 | इमाव | इमाव | सर्वसाधारण | कंडारी बु.<br>ता. वरणगांव |
| 2 | 27 | रोहीत गोपाळ बानाईत<br>प्लॉट नं 37 मकरंद नगर वरणगांव ता.भुसावळ जि.जळगांव 425305 | इमाव | इमाव | सर्वसाधारण | इस्नाळे<br>ता. मुक्ताईनगर |

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र | गुण वत्ता क्र | निवड झालेले उमेदवार यांचे नांव व पत्ता | मुळ जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण प्रकार | पदस्थापना केलेले ग्रामपंचायतीचे नांव व तालुका पंचायत समिती |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 30 | **ऋषिकेश बापुराव देवकर** मु.पो.शेळगांव ता.करमाळ जि.सोलापुर 413202 | आदुघ | आदुघ | अंशकालीन ऐवजी गुणवत्ता नुसार | कोरपावली ता. यावल |
| 4 | 48 | **अमोल भास्कर शहाणे प्लॉट नं ५५, शांती नगर पाचोरा जि.जळगांव** | इमाव | इमाव | दिव्यांग (सी) | रामेश्वर- शहापूर ता. पाचोरा |
| 5 | 85 | **हरी चंद्रकांत तायडे मु.पो रुईखेडा ता.मुक्ताईनगर** जि.जळगांव 425306 | अनु. जाती | अनु. जाती | **माजीसैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने सर्वसाधारण समांतर आरक्षण** | वाघोदा बु ता. रावेर |
| 6 | 130 | **रोहन भिमराव पगारे घर नं 717 खरजाई रोड यशवंत विद्यालय जवळ ,टाकळी प्र.चा ता.चाळीसगांव** 424101 | अनु. जाती | अनु. जाती | **माजीसैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने सर्वसाधारण समांतर आरक्षण** | पाळधी खुर्द ता. धरणगांव |
| 7 | 156 | **पोपट हावश्या भारुडे** मु.शिंदपाडा पो.देवळीपाडा ता.साकरी जि.धुळे 424306 | अनु.जमा ती | अनु.जमा ती | सर्वसाधारण | म्हैसवाडी ता. यावल |
| 8 | 177 | **राजरत्न डिगंबर जोंधळे मु.कुणचेली पो.धानोरा ता.नायगांव जि.नांदेड** | अनु.जाती | अनु.जाती | दिव्यांग (बी) | धामणदे ता. मुक्ताईनगर |
| 9 | 186 | **दिनेश विक्रम मांगाडे** मु.कावरादरी पो.किंन्हीराजा ता.मालेगांव जि.वाशिम 444503 | अनु.जमा ती | अनु.जमा ती | सर्वसाधारण | पारठाणा ता. मुक्ताईनगर |
| 10 | 205 | **नंदिनी सुरेश पवार** मु.पो बोराडी, पानसेमल रोड, ता.शिरपुर जि.धुळे 425428 | इमाव | इमाव | महिला | मेहुणबारे ता. चाळीसगांव |
| 11 | 246 | **जय राजेंद्र कोळी विमल पाटील नगर, जुगादेवी रोड भुसावळ जि.जळगांव** | खुला | खुला | खेळाडू | चोरगव्हाण ता. यावल |
| 12 | 248 | **लतिका मिलींद भोसले** कुबेरनगर, नंदाणे मंगल कार्यालय जवळ, डबकीरोड अकोले जि.अकोला 444002 | आदुघ | आदुघ | महिला | राजुरा ता. मुक्ताईनगर |
| 13 | 317 | **मनोहर भागवत ठाकरे** मु सुटकार, पो.अडावद ता.चोपडा जि.जळगांव 425303 | अनु.जमा ती | अनु.जमा ती | सर्वसाधारण | निंबोल ता. रावेर |
| 14 | 358 | **युवराज लखुराम अहेर मु.करमाळे पो.कनाशी ता.कळवण जि.नाशिक** 423502 | अनु. जमाती | अनु. जमाती | **माजीसैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने सर्वसाधारण समांतर आरक्षण** | विसापूर ता. चाळीसगांव |
| 15 | 390 | **संतोष धरमदास कोकणी मु.झामटयावद पो.भडवड ता.नवापुर जि.नंदुरबार** 425416 | अनु. जमाती | अनु. जमाती | **माजीसैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने सर्वसाधारण समांतर आरक्षण** | बांभोरी बु ता. धरणगांव |
| 16 | 506 | **कोमल पांडूरंग नैतम** हनुमान मंदीर जवळ, अंजनसारा रोड, शिरसगांव बाजार, ता.हिंगणाघाट जि. नागपुर 442304 | अनु.जमा ती | अनु.जमा ती | महिला | निमखेडी बु ता. मुक्ताईनगर |

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र | गुणवत्ता क्र | निवड झालेले उमेदवार यांचे नांव व पत्ता | मुळ जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण प्रकार | पदस्थापना केलेले ग्रामपंचायतीचे नांव व तालुका पंचायत समिती |
|---|---|---|---|---|---|---|
| 17 | 685 | विवेक हिंमत पाटील साने गुरुजी कॉलनी एरंडोल जि.जळगांव | इमाव | इमाव | दिव्यांग (ए) | वनकोठे ता. एरंडोल |
| 18 | 1109 | प्रविण बाळकृष्ण जाधव मु.पो दहिवाळ ता.मालेगांव जि.नाशिक 423105 | इमाव | खुला | माजी सैनिक | वाघळुद बु ता. धरणगांव |
| 19 | 1228 | विकास मेघराज वाघमारे मु.लुखामासला, पो.दायठंण ता.गेवराई जि.बीड 431127 | अनु.जाती | अनु.जाती | खेळाडू | शेरवद ता. धरणगांव |
| 20 | 1328 | वाल्मीक रामराव मगर फलॉट नं 6, मंगलम हाईट, पुनगांव रोड पाचोरा जि.जळगांव | आदुघ | खुला | माजी सैनिक | पथराड ता. भडगाव |
| 21 | 2044 | सुभाष काल्ला पावरा मु.रेवानगर, पो.अमोनी ता.तळोदा जि.नंदुरबार | अनु. जमाती | अनु. जमाती | प्रकल्प ग्रस्त | मंगरुळ ता. चोपडा |

**<u>नियुक्तीच्या अटी व शर्ती</u>**

१) सदर नेमणुक ही पुर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची असून सदर उमेदवारास नोटीसीशिवाय केव्हाही कारण न दाखविता कमी करण्यात येईल अशी आहे.

२) आपली कंत्राटी ग्रामसेवक म्हणून नियुक्ती तीन वर्ष या कालावधीसाठी राहिल.

३) सदर उमेदवारांना देण्यात आलेली नेमणुक नाकारता येणार नाही. सदरची नेमणुक नाकारल्यास त्यांची नेमणुक रद्द करण्यात येईल, त्यानंतर पुन्हा नेमणुक देण्यात येणार नाही.

४) नियुक्तीपूर्वी आपणास सुरक्षा ठेव म्हणुन रु.१०,०००/-(रु.दहा हजार मात्र) एवढी रक्कम नियुक्ती ज्या पंचायत समिती कार्यालयात नियुक्ती दिलेली आहे त्याच ठिकाणी भरावी लागेल व दोन प्रतिष्ठीत व्यक्तींचे जामीनपत्र लिहून दयावे लागेल.

५) नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर कंत्राटी ग्रामसेवक म्हणून आपली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी आपणास कोणत्याही स्वरुपाची वेगळी सूचना दिली जाणार नाही.

६) कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन आपणास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे ज्या ग्रामपंचायतीचा कार्यभार सोपवतील त्या ग्रामपंचायतीचा कार्यभार आपणास सांभाळावा लागेल.

७) नियुक्तीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तवणूक केल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल. त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही तथापि आपली नियुक्ती रद्द करण्याविरुध्द आपणास मा.विभागीय आयुक्त यांचेकडेस अपील करता येईल.

८) नियमित स्वरुपात नियुक्त केलेल्या ग्रामसेवकाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांच्या सेवा सुविधा आपणास अनुज्ञेय असणार नाही.

९) आपले कामकाज समाधानकारक आढळून आल्यास व जिल्हा परिषदेस रिक्त पद उपलब्ध असल्यास आपली नियुक्ती नियमित ग्रामसेवक म्हणुन करण्यांत येईल.

१०) कंत्राटी ग्रामसेवक पदावर तीन वर्ष समाधानकारक काम केल्यानंतर आपणांस ग्रामसेवक नियमित पदावर नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यांबाबत विचार करता येईल.

११) शासन निर्णय वित्त विभाग,क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४ दि.३१/१०/२००५ नुसार उमेदवरांना परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील आणि तसेच सदर उमेदवरांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) चे अंशराशीकरण नियम १९८४ नुसार असलेली निवृत्ती

Scanned with OKEN Scanner

वेतन योजना आणि पूर्वीच्या कर्मचा-यांसाठी असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही. आपली ग्रामसेवक म्हणुन कंत्राटी पध्दतीवर केलेली सेवा परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरण्यांत येतील.वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. रानियो-२०२२/प्र.क्र. ३४/सेवा-४, दि.३१ मार्च २०२३ नुसार उमेदवाराला विकल्प सादर करावयाचा आहे.

१२) दि.२० एप्रिल,२००६ च्या शासन निर्णयातील सुचनांनुसार कंत्राटी ग्रामसेवकांनी ३ वर्षाचा कंत्राटी कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण केल्यांनतर लेखी परिक्षा न घेता (सेवेत आल्यानंतर प्रत्येक कर्मचा-यांसाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा सक्तीची असल्याने) मंजूर पदांच्या उपलब्धतेनुसार सेवा नियमित केली जाईल.

१३) आपण कंत्राटी ग्रामसेवकाचा तीन वर्षाचा कार्यकाल समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर आणि नियमित नियुक्तीसाठी नियमित ग्रामसेवकाची रिक्त पदे उपलब्ध असल्यासच आपली त्या पदावर नियमीत नियुक्ती करण्यांत येईल.

१४) सदर नियुक्तीचे पत्र मिळाल्यानंतर ३० दिवसांचे अंत उमेदवारास नेमणूक दिलेल्या कार्यालयात हजर होणे क्रमप्राप्त राहील.विहीत मुदतीत हजर न झाल्यास त्या पदावर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची आरक्षणानुसार नियुक्ती करणेत येईल.

१५) आपणास कंत्राटी ग्रामसेवक म्हणून हमी पत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास आपण आपल्या गट विकास अधिकारी मार्फत किमान एक महिन्याची पूर्व सुचना आपल्या नियुक्ती प्राधिका-यास देणे अथवा एक महिन्याच्या मानधनाची रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे जमा करणे आवश्यक राहील.आपण विहीत मुदतीत तशी पूर्वसूचना न दिल्यास अथवा मानधनाची रक्कम जमा न केल्यास आपणास पुन्हा भविष्यात ग्रामसेवक म्हणून नियुक्ती देण्यांत येणार नाही.

१६) आपली कंत्राटी ग्रामसेवक म्हणून देण्यांत आलेली नेमणूक पोलीस अधिक्षक यांचेकडून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राचे अधिन राहून देण्यांत येत असून एका महिन्याचे कालावधीत चारित्र्याबाबतचा अनुकुल अहवाल संबंधित पोलीस कार्यालयाकडून प्राप्त न झाल्यास आपली कंत्राटी ग्रामसेवक म्हणून नेमणूक रद्द करण्यांत येईल. त्यासाठी आवश्यक ते विवरणपत्र भरुन पंचायत समितीला दयावे.

१७) कंत्राटी ग्रामसेवक म्हणून आपणास दरमहा रु.१७५००/- (रु.सतरा हजार पाचशे मात्र) एकत्रित वेतन आणि प्रवासभत्ता देण्यांत येईल. त्याखेरीज दोन महिन्याच्या सेवेसाठी एक नैमित्तक रजा किंवा एका कॅलेंडर वर्षात ८ नैर्मित्तक रजा अनुज्ञेय राहतील. तसेच महिला कर्मचा-यास प्रचलित नियमानुसार प्रसुती रजा अनुज्ञेय राहील.

१८) सदर नियुक्ती मागासप्रवर्गात झाली असल्यास जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचे आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समिती कडून प्राप्त करून घेण्याच्या अटीवर करण्यात येत आहे. सदर उमेदवारांचे जात वैधताप्रमाणपत्र सहा महिन्याचे आत प्राप्त न झाल्यास शासनाचे दि.१२/१२/२०११ चे निर्णयात नमुद केल्याप्रमाणे त्या दिनांकापासून सदरची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल. याबाबतचे हमीपत्र रक्कम रु.१००/- चे प्रतिज्ञापत्रावर हजर होतेवेळी संबंधित उमेदवाराने कार्यालयास भरून द्यावयाचे आहे.

१९) कंत्राटी ग्रामसेवक म्हणून निवड झालेल्या उमेदवारांनी आपले मुळ कागदपत्र कार्यालय प्रमुखाकडे जमा करावे. तसेच ज्या सामाजिक समांतर आरक्षण अंतर्गत निवड नेमणुक झालेली आहे त्या संबधीचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी यांचे कडून पडताळणी वेळीच करणेत यावी त्यात त्रुटी आढळल्यास आपली नेमणूक रद्द करणेत येईल.

२०) गट विकास अधिकारी पंचायत समिती, यांनी उमेदवाराची मा.जिल्हा शल्यचिकीत्सक,यांचेकडून वैद्यकिय तपासणी करणे बाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी.

२१) सदर नियुक्तीचे कार्यालयात हजर होण्यापूर्वी सदर उमेदवारांनी यापूर्वी नोकरी (खाजगी संस्थेमध्ये किंवा खाजगी ठिकाणी) करीत असलेल्या सर्व पदांचा राजीनामा देणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

२२) संबंधित कार्यालय प्रमुखांनी या आदेशातील उमेदवारांना हजर करून घेतांना त्यांचेकडून त्यांची जन्मतारीख, जातीचे प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता, नियुक्तीचा प्रवर्ग, संगणक अर्हता इ. माहिती दर्शविणारी सर्व मुळ प्रमाणपत्रके तपासणी करून घेतल्या शिवाय त्यांना हजर करून घेण्यात येवू नये. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र इ. माहिती दर्शविणारी सर्व मुळ प्रमाणपत्रके तपासणी करून घेतल्या शिवाय त्यांना हजर करून घेण्यात येवू नये. संबंधित उमेदवार यांना नियुक्तीचे ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

**हमीपत्र**

मी-------------------------------राहणार------------------ हमीपत्र लिहून देतो की, माझी जळगांव जिल्हा परिषदेच्या कंत्राटी ग्रामसेवक या पदासाठी नेमणूक झालेली आहे. सदर नेमणूक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची असून माझी सेवा मला पूर्व नोटीस न देता अथवा त्यासाठी कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही वेळी समाप्त करण्यात येईल याची मला जाणीव असुन त्या तत्त्वावर मी नेमणूक स्वीकारीत आहे. सदर पदावर किमान ३ वर्ष सेवा पूर्ण केल्या शिवाय अन्य जिल्हा परिषमध्ये बदलीने नेमणूक बाबत मला अर्ज करता येणार नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे. नेमणुक आदेशातील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून, सर्व अटींशी मी सहमत व बांधील आहे.

समक्ष

उमेदवाराची स्वाक्षरी

कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी, हुद्दा व दिनांक

सदर आदेशाची नोंद संबधीतांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात येवुन सदर आदेशाची शासन नियमानुसार तातडीने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर आदेशानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल तातडीने या कार्यालयाकडेस सादर करण्यात यावा.

Minal

मिनल करनवाल (भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

प्रत.- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
१. संबंधीतांस पोष्टाव्दारे / ई-मेलव्दारे
२. म.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती जळगांव यांना सविनय सादर
३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांना माहितीस्तव
४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.जळगांव यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (साप्रवि) जि.प.जळगांव यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना
६. आदेशात नमुद पदस्थापित कार्यालयाचे संबंधित कार्यालय/विभाग प्रमुख यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना.
२/- उपरोक्त आदेशात नमूद अटीनुसार पूर्तता व योग्यत्या हमीपत्र व कागदपत्रांची पुर्तता करुन संबंधीतांना मुदतीत हजर करुन घेऊन कार्यवाहीचा अहवाल ग्रामपंचायत विभागाकडेस सादर करावा.
७. जि.प.जळगांव संकेत स्थळ प्रसिध्दीस

Minal

मिनल करनवाल (भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

Scanned with OKEN Scanner